# इंटरनेट वापरा जबाबदारीने

## सुरक्षित वापरासाठी शालेय विद्यार्थ्यांना धडे

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

सोशल नेटवर्किंग साइटसचा वापर करताना पासवर्ड कसा ठेवावा, फोटो अपलोड करताना कोणती काळजी घ्यावी, व्हायरस ओळखून त्याचा प्रतिकार कसा करावा, असे महत्त्वपूर्ण धडे गुरुवारी सेंट जॉन बाप्टिस्ट हायस्कूलमधील टेक्नोसॅव्ही विद्यार्थ्यांनी गिरविले. अहान फाऊंडेशनतर्फे 'बिइंग रिस्पॉन्सिबल नेटिझन्स'या उपक्रमातील दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेटची माहिती देण्यात आली.



इंटरनेटच्या वापरात सर्वाधिक संख्या तरुणांची आहे. शाळेतील अनेक विद्यार्थीही सोशल नेटवर्किंग साइटसचा वापर करत आहे. ऑनलाइन गेम खेळणे, चित्रपट, गाणी व डाऊनलोड करणे यांसारख्या अनेक कृतींसाठी शालेय विद्यार्थी इंटरनेटचा वापर करतात. मात्र पुरेशी सुरक्षितता न बाळगल्याने सायबर गुन्ह्यांचा सामना त्यांना करावा लागतो. अशा घटना वाढत असल्याने शालेय वयातील विद्यार्थ्यांपर्यंत सुरक्षित इंटरनेट वापराचे नियम पोहचविण्यासाठी 'बीइंग रिस्पॉन्सिबल नेटिझन्स' ही मोहीम आता शाळाशाळांमध्ये राबवण्यात येत आहे.

यावेळी मोहिमेला सहकार्य करणारे क्विक हिल फाऊंडेशन, अजय शिर्के, डॉ. अनुराधा सोवनी, अहान फाऊंडेशचे पराग पैठणकर, उन्मेश जोशी, सेंट जॉन शाळेचे फादर मायकल पिंटो आदी उपस्थित होते. यावेळी मुलांशी संवाद साधत त्यांना सुरक्षित इंटरनेट वापरण्याचा कानमंत्र देण्यात आला. अहान फाऊंडेशनचे उन्मेश जोशी आणि सोनाली पाटणकर यांनी सादरीकरणातून इंटरनेटच्या सुरक्षिततेचे नियम विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले. यावेळी शिक्षकांनाही मार्गदर्शन करण्यात आले.

तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन अतिवापरामुळे अनेकदा अजाणत्या वयात मुले सायबर गुन्ह्यांना बळी पडतात, त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापरण्याचे नियम सांगण्याची गरज भासली. ठाणे शहर इंटरनेटदृष्ट्या साक्षर आणि सुरक्षित करण्यासाठी शहरातील तरुण वर्गाला या उपक्रमात सहभागी करून घेणे अधिक आवश्यक असल्याचे उन्मेश जोशी यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांना टिप्स

- सोशल साइटचा वापर काळजीपूर्वक करा.
- पासवर्ड ठेवताना तो अवघड असावा, तो पालकांना सांगा.
- ऑनलाइन गेम अपरिचित व्यक्तींसह खेळू नका.
- फोटो शेअर करताना सेटिंग तपासा.
- फोटोचे रिझॉल्युशन कमी ठेवा. परवानगीशिवाय इतरांचे फोटो अपलोड करू नका.
- अनावश्यक लिंक्सवर क्लिक करू नका.
- चित्रपटांची पायरसी टाळा.
- वैयक्तिक माहिती शेअर करू नका.
- गैरप्रकार आढळल्यास न घाबरता पालक आणि शिक्षकांना सांगा.